कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना
टोल फ्री क्रमांक - १०६४
कार्यालय दुरध्वनी क्र :- ०२४८२-२२०२५२

:: प्रेस नोट :: दिनांक :- ०७.०९.२०२१.

**म.रा.वि.वि.कं.लि. जालना येथील अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. रेवानंद लक्ष्मण मोरे यांना खासगी इसमासह तीन बीज मीटरचे वीज बील कमी करुन देण्यासाठी प्रत्येकी १०,०००/- रुपये याप्रमाणे ३०,०००/- रुपयेची लाच स्विकारतांना पकडले.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | ३. लोकसेवक श्री. रेवानंद लक्ष्मण मोरे, वय ५४ वर्ष अतिरिक्त कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.कं.लि.जालना रा. कृष्णकुंज सोसायटी घर नं ४०३ बी-२ मंठा बायपास जालना<br>४. श्री. दिपक रतन नाडे, वय ३१ वर्ष व्यवसाय ड्रायव्हर रा ढोरपुरा, रामनगर जालना |
| २ | गुन्हा घ ता व ठीकाण | :- | दि- ०६.०९.२०२१ रोजी लोकसेवक यांचे कार्यालयसमोर म.रा.वि.वि.कं.लि.शहर उप विभाग, जालना, जि. जालना येथे |
| ३ | लाच स्विकारली रक्कम | :- | ३०,०००/- रुपये. |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की, तक्रारदार यांनी त्यांचे ग्राहकांना सोलार पॅनल सिस्टीम बसवुन दिले होते, त्यामुळे त्यांचे ग्राहकांचे तीन वीज मीटरचे बील कमी झालेले नव्हते, म्हणुन तक्रारदार यांनी म.रा.वि.वि.कं.लि शहर उपविभाग जालना येथील अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. रेवानंद मोरे यांना सदरील ग्राहक यांचे तीन विदयुत मीटरचे वीज बील कमी करण्यासाठी विनंती केली असता त्यांनी तुम्हाला तीन विदयुत मीटरचे वीज बील कमी करुन देण्यासाठी प्रत्येकी १०,०००/- रुपये याप्रमाणे ३०,०००/- रुपये दयावे लागतील, अन्यथा तुमचे ग्राहकाचे विदयुत मीटर कनेक्शन कट करण्यात येईल, असे म्हणुन ३०,०००/- रुपये लाचेची मागणी केली. सदर कामासाठी तक्रारदारास अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. रेवानंद मोरे यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद येथे संपर्क साधून तक्रार दिली.

सदर तक्रारीवरून दि. ०६.०९.२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद येथील पोलीस निरीक्षक श्री. संदीप राजपुत यांनी लाच मागणी पडताळणी केली असता अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. रेवानंद मोरे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे ग्राहकांचे तीन विदयुत मीटरचे वीज बील कमी करुन देण्यासाठी प्रत्येकी १०,०००/- रुपये याप्रमाणे ३०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन खासागी इसम श्री. दिपक रतन नाडे याचे मार्फतीने स्विकारणार असल्याचे निष्पण्ण झाल्याने अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. रेवानंद मोरे यांनी तक्रारदार यांना ३०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन खासगी इसमाचे हस्ते तक्रारदार यांचेकडुन ३०,०००/- रुपयेची लाचेची रक्कम स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद चे पथकाने म.रा.वि.वि.कं.लि शहर उपविभाग जालना येथील अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयाचे आवारात पकडले आहे.

१) लोकसेवक श्री. रेवानंद लक्ष्मण मोरे, वय ५४ वर्ष अतिरिक्त कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.कं.लि.जालना रा. कृष्णकुंज सोसायटी घर नं ४०३ बी-२ मंठा बायपास जालना श्री. दिपक रतन नाडे, वय ३१ वर्ष व्यवसाय ड्रायव्हर रा ढोरपुरा, रामनगर जालना यांचे विरुध्द पोलीस ठाणे कदीम जालना जि. जालना येथे गुन्हा दाखल करुन पुढील तपास श्री. एस.एस.शेख, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना यांचेकडे देण्यात आला आहे.

**तसेच अँन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास ०२४८२-२२०२५२, तसेच टोल फ्री क्रमांक १०६४ वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. ८९७५७६२९०६, पोलीस निरीक्षक मो.नं. ८३९०७५७८३५, ९८२३२१६७८८ वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधिक्षक,
ला प्र वि, जालना.